# <u>प्रेसनोट</u>

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा. क्रं. 80 / 2024 दिनांक : 29.02.2024

### नांदेड पोलीस दलातील सात पोलीस अंमलदार सेवानिवृत्त...

नांदेड पोलीस दलातील सात पोलीस अंमलदार यांचा नियत वयोमानानुसार दिनांक 29.02.2024 रोजी सेवानिवृत्त होत आहेत. **मा. श्रीकृष्ण कोकाटे,** पोलीस अधिक्षक नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली **श्रीमती डॉ अश्विनी जगताप**, पोलीस उप–अधिक्षक (मु) नांदेड, **मा. श्री संकेत गोसावी**, उपविभागीय पोलीस अधीकारी देगलुर, हस्ते सर्व सेवानिवृत्तांचा पुष्पगुच्छ, शाल श्रीफळ व भेट वस्तु देवुन सत्कार करण्यात आला. सदर कार्यक्रमा पुर्वी मा. विशेष पोलीस महानिरक्षक साहेब नांदेड परिक्षेत्र नांदेड यांची वार्षीक तपासणीचे अनुषंगाने जिल्हयातील सर्व उपविभागीय पोलीस अधीकारी व पोस्टे स्वाधीन अधीकारी, शाखा अधीकारी यांची गुन्हे बैठक घेण्यात आली. सदर बैठकमध्ये गुन्हयास आळा घालणे व आगामी लोकसभा निवडणुक अनुषंगाने चर्चा झाली असुन सर्वाना मार्गदर्शन करण्यात आले. सदर बैठक ही मंथन हॉल पोलीस अधिक्षक कार्यालय नांदेड येथे पार पडली. सदर बैठकीस **मा. श्री शशिकांत महावरकर**, विशेष पोलीस महानिरीक्षक नांदेड परिक्षेत्र नांदेड, **मा. श्रीकृष्ण कोकाटे**, पोलीस अधीक्षक नांदेड, **मा. श्री आबिनाश कुमार**, अपर पोलीस अधिक्षक नांदेड, **मा. श्री.खंडेराव धरणे**, अपर पोलीस अधिक्षक भोकर, जिल्हयातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी तसेच पोस्टे स्वाधीन अधिकारी नांदेड जिल्हा **मा. श्री नामदेव रिठठे**, पोलीस निरीक्षक कल्याण **श्री शिवाजी लष्करे**, सपोनि तथा जनसंपर्क अधिकारी **मपोउपनि माया भोसले**, पोलीस कल्याण विभाग नांदेड, इतर पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार मोठया संख्येने हजर होते. सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सपोउपनि **श्री विठ्ठल कत्ते** यांनी केले असुन, **मपोकॉ राखी कसबे**, पोलीस कल्याण यांनी कार्यक्रमाचे नियोजन चांगल्या प्रकारे केले.

| अ.क्र. | हुद्दा | सेविनिवृत्त अंमलदाराचे नाव | नेमणुक |
|---|---|---|---|
| 01 | रापोउपनि | मुजीबाद्दीन फेजोद्दीन | मोटर परिवहन विभाग नांदेड |
| 02 | सपोउपनि | शेषेराव गोपालराव बरगे | पोलीस मुख्यालय नांदेड |
| 03 | पोहेकॉ | भगवान विठ्ठलराव भोसले | पोस्टे कंधार |
| 04 | पोहेकॉ | राधोशाम देविदास परीवाले | पोस्टे विमानतळ |
| 05 | पोहेकॉ | मेहन संघा राठोड | जी. पी. यु पथक नांदेड |
| 06 | पोहेकॉ | नागनाथ पोशटटी मुंडलोड | पोस्टे धर्माबाद |
| 07 | पोहेकॉ | नारायण नानाराव पतंगे | पेलीस मुख्यालय नांदेड |

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

# <u>प्रेसनोट</u>

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड    जा. क्रं.  81/2024        दिनांक : 29.02.2024

## 1)खुन :—

**उमरी :—**दिनांक 28.02.2024 रोजी चे 14.30 वा. चे सुमारास, **किरण कंदेवाड यांचे दुकानासमोर व्यंकटेश नगर उमरी ता. उमरी जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे राजु रामा धोत्रे, वय 26 वर्षे, रा. रेल्वेस्टेशन पाठीमागे व्यंकटेशनगर उमरी ता. उमरी जि. नांदेड,** हा बाजेवर मोबाईल पाहत झोपला असताना मागील भांडणाचा राग मनात धरून यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करून मोटार सायकलवर येऊन चाकुने मयताचे पोटात मारून खुन केला. वगैरे **फिर्यादी सपना पि. रामा धोत्रे, वय 18 वर्षे, व्यवसाय घरकाम रा. रेल्वे स्टेशन पाठीमागे व्यंकटेशनगर उमरी ता. उमरी जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे उमरी** गुरन 97/2024 कलम 302, 34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री माने, मो.नं. 9420827001** हे करीत आहेत.

## 2)गंभीर दुखापत :—

**1)विमानतळ :—** दिनांक 27.02.2024 रोजी चे 23.00 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे घरासमोर हनुमानगडच्या जवळ ताजनगर नांदेड येथे,** यातील फिर्यादीने आरोपीतांना घरामोर ॲटो का लावला असे विचारले असता नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करून शिवीगाळ करून थापडा बुक्यांनी मारहाण करून लोखंडी रॉडने पाठीवर मारून दुखापत केली. व डोक्यात मारून जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी महेंद्र बाबुराव खिल्लारे, वय 38 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. हनुमानगडच्या जवळ ताजनगर नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं 57/2024 कलम 326, 324, 323, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री जाधव, मो.क्रं. 9765902710** हे करीत आहेत.

**2)नांदेड ग्रामीण :—** दिनांक 28.02.2024 रोजी चे 09.00 वा. चे सुमारास, **नागपुर रोडवर सिध्दनाथ मळयाजवळ ता. जि. नांदेड येथे,** यातील नमुद नऊ आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी जमवुन हातात रॉड, काठया, चाकु, घेवुन जुण्या भांडणाचे कारणावरून फिर्यादी व त्यांचे काका यांना शिवीगाळ लोखंडी रॉडने पाठीवर, तोंडावर डोक्यात, डाव्या पायावर मारहाण करून गंभीर दुखापत केली. वगैरे **फिर्यादी गजनान शिवराम अवतिरक, वय 23 वर्षे, व्यवसाय शेती, रा. सिदनाथ ता. जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 156/2024 कलम 326, 143, 147, 148, 149, 504, 506 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री कांबळे, मो.क्रं. 9823031227** हे करीत आहेत.

## 3)विवाहीतेचा छळ :—

**1)देगलुर :—** सन 2018 ते आज पावेतो, **फिर्यादीचे सासरी गुळानी ता. खेड जि. पुणे व माहेरी जोशीगल्ली देगलुर ता. देगलुर जि. नांदेड येथे,** यातील नमुद सात आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस तुझे माहेरहुन भाजीपाला दुकानाकरीता व प्लॉट घेण्यासाठी दहा लाख रूपये घेवुन ये नाहीतर नांदवुन घेत नाही म्हणुन थापडा बुक्यांनी मारहण करून व शिवीगाळ करून शारिरीक माणसीक छळ करून जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 32 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे देगलुर** गुरनं 89/2024 कलम 498(अ), 323, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2562 पत्रे, मो.क्रं. 8767312795** हे करीत आहेत.

**2)अर्धापुर :— दिनांक 05.05.2021 ते दिनांक 16.08.2022 पर्यंत बरकतपुरा अर्धापुर ता. अर्धापुर जि. नांदेड येथे,** यातील नमुद नऊ आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस म्हणाले की, तुझे वडिलांनी वरचा मजला बांधण्यासाठी दिलेले पाच लाख रूपये आमचेकडुन भरणं होत नाही, बँकेचा हाप्ता भरत नाही. तो तुझे आई वडीलांनी भरावा असे म्हणुन उपाशी पोटी ठेवुन थापडा बुक्यांनी मारहाण करून शारिरीक माणसीक छळ करून जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 25 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापुर** गुरनं 77/2024 कलम 498(अ), 323, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1336 आडे, मो.क्रं. 9823151336** हे करीत आहेत.

## 4)शासकीय कामात अडथळा :–

**1)मरखेल :–** दिनांक 27.02.2024 रोजी चे 19.30 वा. चे सुमारास, **मौ. बेम्बरा तांडा ते भुतनहिपरगा चौरस्ता जाणारे रोडवर ता. देगलुर जि. नांदेड येथे**, यातील फिर्यादी हे तेलंगणा राज्याची बस क्रमांक एपी–29/झेड–1897 निजामाबाद ते घुळामार्गे औरादकडे प्रवाशी घेऊन जात असतांना रोडवर साईड देण्यासाठी हॉर्न वाजविल्याच्या कारणावरून यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीस अश्लील शिवीगाळ करून लाथा बुक्याने मारहाण करून उजव्या डोळयास दुखापत केली व शासकीय कामात अडथळा निर्माण केला. वगैरे **फिर्यादी गोपाळ नंदु वडत्या, वय 57 वर्षे, व्यवसाय बस चालक डेपो बासवाडा मंडळ बासवाडा जि. कामारेड्डी राज्य तेलंगणा** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मरखेल** गुरनं 35/2024 कलम 353, 332, 294, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/संकेत दिघे, मो.क्रं. 9834255985** हे करीत आहेत.

**2)वजिराबाद :–** दिनांक 28.02.2024 रोजी चे 11.30 वा. चे सुमारास, **मिलगेट नांदेड येथे**, यातील फिर्यादी हे मिलगेट परिसरात थकबाकीदार यांचे मालमत्ता यावर असलेली 2,87,022 ची थकबाकी वसुली करण्यासाठी गेले असता यातील नमुद तीन आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीस व सोबत असलेल्या कर्मचारी यांना मारहाण करून शासकीय कामात अडथळा निर्माण केला. व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी गौतम विठठल कवडे, वय 53 वर्षे, व्यवसाय कार्यालय अधीक्षक तथा प्रभारी करनिरीक्षक क्षेत्रिय कार्यालय महानगरपालीका वजिराबाद नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 103/2024 कलम 353, 332, 186, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री आगलावे, मो.क्रं. 9890630130** हे करीत आहेत.

## 5)अंमली पदार्थ :–

**वजिराबाद :–**दिनांक 27.02.2024 रोजी चे 17.00 वा. चे सुमारास, **जिल्हा मध्येवर्ती कारागृह नांदेड येथे**, यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या गांजा 0.014 कि. ग्रॅ. किंमती 250/–रू चा आपले ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्री प्रकाश गणपतराव आवडे, ने. पोलीस नियंत्रण कक्ष नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 101/2024 कलम 20(ब),(आयआय)(ए) एनडीपीएस कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री राजु वटाणे, मो.क्रं. 7972486163** हे करीत आहेत.

## 6)जुगार :–

**शिवाजीनगर :–**दिनांक 28.02.2024 रोजी चे 17.10 वा. चे सुमारास, **श्रावस्तीनगर पाटीजवळ नांदेड येथे**, यातील नमुद चार आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या तिर्रट नावाचा जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 1540/–रुपये व साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोकॉ/श्री दत्ता नामदेव वडजे, ने. पोस्टे शिवाजीनगर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 77/2024 कलम 12 (अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2753 लियाकत शेख, मो.क्रं. 9923799345** हे करीत आहेत.

## 7)प्रोव्हिबीशन :–

**किनवट :–** दिनांक 28.02.2024 रोजी चे 10.54 वा. चे सुमारास, **मौ. अंधबोरी आरोपीचे किराणा दुकानाचे बाजुस ता. किनवट जि. नांदेड येथे**, यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी संत्रा किंमती 1925/–रूपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/893 गजानन श्रावण डुकरे, ने. पोस्टे किनवट** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे किनवट** गुरनं 43/2024 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोहेकॉ/2440 लखुळे, मो.नं. 9527062610** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी<br>
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड